# 15th INTERNATIONAL INTERDISCIPLINARY CONFERENCE

# १५वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

भाग एक



## 'Contribution of Shahu Maharaj, Mahatma Phule and Dr. Babasaheb Ambedkar at National and International Levels'

## 'जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान'

संपादक

डॉ. स्नेहल तावरे

डॉ. शोभा इंगवले

- स्नेहवर्धन प्रकाशन - क्र. १२४५
- 'जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान' (भाग एक)
  (समीक्षा - संदर्भ)
- **प्रकाशक आणि मुद्रक –**
  डॉ. एल. व्ही. तावरे
  स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ, महात्मा फुले सभागृहामागे,
  पुणे - ४११०३०.
  स्थिरभाष - (०२०) २४४७ २५ ४९ / २४४३६९६१
  ई-मेल - snehaltawre@gmail.com
- © सर्व हक्क सुरक्षित
- **प्रथमावृत्ती** – ७ फेब्रुवारी २०१९
  पंधरावी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे
- **मुखपृष्ठ** – संतोष धोंगडे
- **अक्षरजुळणी** – एस. एस. ग्राफिक्स, पुणे
- **मुद्रणस्थळ** – स्मिता प्रिंटर्स, पुणे
- **ISBN 978-93-87628-42-7**
- **पृष्ठसंख्या** – १९२
- मूल्य –₹ २०० /–
  $ 3

१४) श्री शाहू महाराजांचा सकलजनवादी विचार — डॉ. वैशाली पवार /६३

१५) राजर्षी शाहू महाराजांचा सामाजिक दृष्टिकोण — डॉ. कल्पना गावडे /६७

१६) छत्रपती राजर्षी शाहू महाराज - सुधारणावादी समाजसुधारक आणि लोकनेते — डॉ. वंदना चव्हाण /७१

१७) जागतिक स्तरावर छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान — डॉ. डी. एस. बोरकर /७५

१८) राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान — डॉ. गणेश मालटे /७९

१९) स्त्री संरक्षण व स्त्री शिक्षणाचे आधारस्तंभ - छत्रपती राजर्षी शाहू महाराज — डॉ. शुभांगी कुऱ्हाडे /८३

२०) राजर्षी शाहू महाराज यांचे योगदान — डॉ. विक्रम जाधव /८७

२१) राजर्षी शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान — डॉ. दीपक गायकवाड /९१

२२) राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक योगदान — डॉ. मंदा नांदुरकर /९५

२३) लोककल्याणकारी राजा : राजर्षी छत्रपती शाहू महाराज — डॉ. प्रतिभा घाग /९९

२४) समाजसुधारक राजर्षी शाहू महाराज यांचे बहुजनांसाठीचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान — डॉ. जगदीश खैरे /१०३

२५) छत्रपती शाहू महाराजांच्या कृती कार्यक्रमातील 'सामाजिक न्याय' — डॉ. माणिक सोनावणे /१०७

२६) शाहू महाराजांचे कलाप्रेम — डॉ. वैजयंतीमाला जाधव /१११

२७) राजर्षी शाहू महाराज यांचे क्रीडा योगदान — डॉ. सुदाम शेळके, प्रा. रूपेश थोपटे /११५

२८) राजर्षी शाहू यांचे शैक्षणिक योगदान — डॉ. सारिका बहिरट /११७

२९) राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कृषी क्षेत्रातील योगदान — प्रा. प्रशांत आरसुळ /१२१

३०) जागतिक स्तरावर शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान — प्रा. विवेक खटवटे /१२५

# शाहू महाराजांचे शैक्षणिक योगदान

डॉ. दीपक बबन गायकवाड
भ्रमणभाष : ९०४९०९७०३७

महात्मा फुले, सयाजीराव गायकवाड व राजर्षी शाहू महाराज हे भारतीय शिक्षणाचे मूळ आधारस्तंभ आहेत. या थोर महामानवांच्या अथक प्रयासाने शिक्षण पद्धती उभी राहिली. बहुजन समाजाला शिक्षणाची दारे उघडली. तत्कालीन परिस्थितीत हे कार्य जर झाले नसते तर आजचे शैक्षणिक वातावरण कदाचित वेगळे दिसले असते. म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचा लेखाजोखा ही या लेखाची मध्यवर्ती कल्पना आहे.

**शिक्षणविषयक कार्य –** अर्वाचीन कालखंडात सर्व संस्थानिकांमध्ये शाहू महाराज यांचे कार्य श्रेष्ठ आहे. शाहू महाराजांनी सामाजिक विषमतेचे निर्मूलन केले, त्याचबरोबर येथील शिक्षणाची परिस्थिती सुधारण्यासाठी अथक प्रयत्न केले. सामाजिक विषमता व शिक्षणाबद्दल फक्त आपल्या भाषणातूनच त्यांनी विचार मांडले नाहीत तर प्रत्यक्षात आपल्या संस्थानात व खासगी व्यवहारातूनही त्यांनी प्रत्यक्षात कृतीतून उतरवले होते. न. र. फाटक म्हणतात, ''जनतेमध्ये ज्ञानाचा प्रसार झाल्याशिवाय स्वराज्य चालवण्याची पात्रता लोकांत यावयाची नाही. तिच्यासाठी निदान प्राथमिक तीन इयत्तांपर्यंत प्रत्येक माणसाचे शिक्षण झालेच पाहिजे, तितके शिक्षण झाले की आपण आपले राज्य लोकांच्या स्वाधीन करू, अशी भाषा शाहू महाराजांनी वापरली होती.'' आज स्वातंत्र्याला सत्तर वर्षे पूर्ण होऊनही ग्रामीण व शहरी भागातील कित्येक मुले प्राथमिक शिक्षणापासून वंचित आहेत. त्यांच्यासाठी आपण अजूनही योग्य पावले उचलू शकलेलो नाहीत. शिक्षणाच्या प्रवाहात आपण त्यांना कधी सामील करून घेऊ हे भविष्यकाळ ठरवेल. पण हे शाहू महाराजांचे स्वप्न ज्या वेळेस आपण पूर्ण करू तेव्हा खऱ्या अर्थाने त्यांच्या आचार-विचाराचे आपण पालन करू शकलो असे म्हणावे लागेल.

**शाहू महाराजांची भाषणे –**

अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे पहिले अधिवेशन दि. २७/१२/१९१७ रोजी खामगाव येथे भरले होते. या अधिवेशनात महाराजांनी 'स्वराज्य आणि शिक्षण' या विषयावर आपले विचार व्यक्त केले. भारतातील जातीयवाद मोडून काढल्याशिवाय व बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय स्वराज्याचा फायदा बहुजन समाजास होणार नाही. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तीन मूल्यांची

जपणूक शिक्षणाच्या माध्यमातूनच आपण करू शकतो. हे महाराजांचे विचार आजही आपल्याला मार्गदर्शक वाटतात. महाराज या भाषणात म्हणतात, ''शिक्षणानेच आमचा तरणोपाय आहे असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशांत उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत. म्हणूनच सक्तीचे व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. याबाबतीत आमचा गतकाल म्हटला म्हणजे इतिहासातील एक अंधारी रात्र आहे. फक्त एकाच जातीने विद्येचा मक्ता घेतला होता. मनू आणि त्याच्या मागून झालेल्या शास्त्रकारांनी त्या त्या वेळेच्या ध्येयाला अनुसरून निरनिराळ्या जातींच्या व्यवहारास बंधनकारक असे निर्बंध रचले आणि कमी जातीच्या लोकांना विद्यामंदिराचे दरवाजे बंद करण्यात आले'' हे महाराजांचे विचार म्हणजे तत्कालीन परिस्थितीची फक्त जाणीव नाही तर भविष्यकालीन शिक्षणाविषयी असलेली दूरदृष्टी दिसते. शिक्षणाचा गतइतिहास महाराज जाणत होते. एक राज्यकर्ता म्हणून ही जाणीव त्यांच्यामध्ये होती. समतेचा दृष्टिकोन घेता आजच्या राज्यकर्त्यांना ही जाणीव आहे का? या महाराजांच्या शिक्षणविषयक विचारांना आपण पात्र ठरणार की नाही याचे आत्मपरिक्षण केले पाहिजे.

शाहू महाराजांनी सर्व स्तरांतील लोकांना शिक्षण मिळावे म्हणून प्रयत्न केले. ब्राह्मण व ब्राह्मणेतर ही दरी कमी करण्याचा प्रयत्न केला. जातिपाती मोडून काढायच्या असतील तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यासाठी आपला समाज सुशिक्षित करणे व त्याची मने तयार करणे, प्रत्येकाने आपल्या समाजातील व्यक्तींच्या कल्याणाकरिता झटले पाहिजे. निरनिराळ्या समाजातील लोकांना शिक्षण देण्यासाठी एक व्यवस्था महाराजांनी तयार केली. त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्या त्या कुटुंबातील लोकांना महाराजांनी मदत केली. प्रत्येक जातीतील तरुणांचा बुद्धिविकास होण्यासाठी शिक्षणाचा महत्त्वाचा संस्कार गरजेचा आहे, त्यातून एकजिनसी समाज निर्माण होईल, असे त्यांना वाटे.

सर्वच क्षेत्रांत शिक्षणाची जरुरी आहे, असे महाराजांना वाटत असे. शेतकीच्या व्यवसायात, व्यापारात, बलाढ्य राष्ट्रनिर्मितीसाठी शिक्षण घेतले पाहिजे. महाराज म्हणतात, ''शिक्षणाची जरुरी नाही अशी कोणतीही चळवळ नाही. आम्ही कसे खावे, श्वास कसा घ्यावा हेही आम्हांस शिकले पाहिजे. तथापि ही गोष्ट खरी आहे. हल्लीच्या काळी शेती इतकी काही पद्धतशीर झाली आहे की ज्याला यात यश मिळवायचे आहे त्याला त्या विषयावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत व समजली पाहिजेत.'' महाराजांनी सन १९१७ साली शेतकऱ्यांनी पुस्तके वाचली पाहिजेत असे सांगितले. शेती व्यवसायाच्या भवितव्यासाठी त्यांनी केलेले हे चिंतन विचार करायला लावणारे आहे. या भाषणाला शंभर वर्षे होऊनही आजही तेवढेच महत्त्व आहे. ग्रामीण भागात आजही ऐंशी टक्के शेतकरी लिहू-वाचू शकत नाहीत.

त्यामुळे निर्माण होणारे प्रश्न गंभीर बनत चाललेले आहेत. शेतकऱ्यांच्या शिक्षणाविषयी महाराजांनी जसे विचार मांडले तसेच सैन्यबळाविषयी मांडलेले आहेत. अर्वाचीन युद्धपद्धतीत शिक्षणाची अत्यंत जरुरी आहे. प्रत्येक सैनिकास संग्राम शास्त्रावरील पुस्तके वाचता आली पाहिजेत. जर मराठे लोकांना शिक्षण मिळेल तर ते खातरीने अधिक चांगले योद्धे होतील. हल्लीच्या लढाईच्या दिवसांत तोफखान्यावरील लोक उत्तम गणिती असले पाहिजेत.

महाराजांनी आपल्या प्रत्येक भाषणातून शिक्षणासंबंधी दूरदृष्टीचे विचार मांडले. सन १९१८ साली परळ येथे भरलेल्या कामगारांच्या प्रचंड जाहीर सभेत महाराज म्हणतात, ''आपल्या मुलाबाळांस शिक्षण देऊन व आपले आरोग्य वाढविण्याचे प्रयत्न करून आपली उन्नती आपणच करून घेतली पाहिजे. दुसरा आपल्याकरिता काही करील अशी अपेक्षा करणे केव्हाही कमीपणाचे आहे.'' कामगारांना शिक्षणाच्या माध्यमातून क्रांतीची दिशा दाखवणारा हा जगातील पहिला राजा होय. जनतेने आपल्या आर्थिक आणि शैक्षणिक गरजा भागविण्यासाठी सतत झगडले पाहिजे असा जाहीर उपदेश महाराजांनी त्यावेळेसच्या कामगारांना दिला होता.

महाराजांनी शिक्षण क्षेत्रातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न केला. मिरजेचे अमेरिकन मिशन, सेंट झेविअर, वुइल्सन कॉलेज व बंगलोर, पाचगणी येथील मिशन शाळा किंवा आर्य समाजाच्या शाळा, कॉलेजे, गुरुकुले, रेल्वे व सरकारी अधिकारी ज्याप्रमाणे भेदभाव करत नाहीत त्याप्रमाणे संस्थानातील विद्या खात्याने वागावे. सरकारी मदत मिळणाऱ्या कोणत्याही शाळेत अस्पृश्य विद्यार्थी आला तर इतर विद्यार्थ्यांप्रमाणे त्याला शाळेत घ्यावे. जर याचे उल्लंघन केले तर संबंधित संस्थेला, प्राचार्यांना व शिक्षकांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना महाराजांनी दिल्या होत्या. रावसाहेब तुकाराम पाटील यांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात, ''करवीर इलाख्यांत (जहागिरी सोडून) अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असता, त्या सर्व येत्या दसऱ्यापासून बंद करण्यात याव्यात व अस्पृश्यांच्या मुलांस सरकारी शाळांतून इतर लोकांच्या मुलांप्रमाणेच दाखल करून घेत जावे. सरकारी शाळांतून शिवाशिव पाळण्याची नसल्याने सर्व जातीच्या व धर्माच्या मुलांस एकत्र बसविण्यात येत जावे.'' अस्पृश्य समाजातील मुलांच्या शिक्षणाची काळजी घेणारा हा देशातील पहिला राजा होय. म्हणून शिक्षणाच्या माध्यमातून भारतातील अस्पृश्यता निवारण करणारे राजर्षी शाहू हेच आद्य जनक ठरतात.

**समारोप –**

बहुजन समाजातील विद्यार्थ्यांची काळजी घेणारा, शिक्षणातून समता निर्माण करणारा हा लोकराजा २१ नोव्हेंबर १९१७ रोजी आपल्या संस्थानात मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा करतो. सक्तीच्या व मोफत शिक्षणाची फार जरुरी आहे, असे द्रष्टेपण महाराजांकडे होते. प्राथमिक शिक्षणाच्या संदर्भात राजर्षी शाहूंनी घेतलेले निर्णय महाराष्ट्राच्या सामाजिक अभिसरणाच्या दृष्टीने अत्यंत

महत्त्वाचे आहेत. आपल्या संस्थानात मुलामुलींच्या एकत्र शाळा सुरू केल्या, पण खास मुलींच्याही शाळा स्वतंत्रपणे स्थापन केल्या. एवढेच नव्हे तर प्रौढ स्त्रियांच्या शिक्षणाबाबतही महाराजांनी विशेष लक्ष दिले. त्यासाठी वसतिगृहाच्या माध्यमातून मोफत राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली. एकंदरीत राजर्षी शाहूंनी शिक्षण क्षेत्रात केलेले कार्य त्यांच्या आधुनिक व पुरोगामित्वाचे गमक आहे. जागतिक स्तरावर शिक्षणविषयक क्षेत्रात या त्यांच्या कार्याची नोंद घेतली जात आहे.

### संदर्भ

भगवानराव जाधव, 'राजर्षी शाहू महाराजांची भाषणे', राजर्षी प्रकाशन, कोल्हापूर, १९७१